नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २८२ | Issue - 282 | वार शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ | Blow- Friday Date 28 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएस आरपी नंबर प्लेट लावणे बंधनकारक

मुंबई : केंद्रीय मोटार नियम १९८९ च्या नियमानुसार सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसविणे बंधनकारक आहे. वाहन विक्रेत्याकडून ०१एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्यात येत आहे. मात्र ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना ही नंबर प्लेट सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार लावणे बंधनकारक केले आहे. देशातील बहुतेक राज्यात जुन्या वाहनांना अशा प्रकारची नंबर प्लेट लावण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्र राज्यातील ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी लावण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. त्यानुसार उच्चाधिकार समितीने ३ कंपन्यांचे दर अंतिम केले आहे.

# वक्फ बोर्ड सुधारित विधेयक मंत्रिमंडळाकडून मंजूर

## १४ बदलांसह सुधारित वक्फ बोर्ड विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वक्फ बोर्ड विधेयकावरून गेल्या काही दिवसांपासून चर्चा चालू आहे. हे विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात संसदेत मांडण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. समितीकडून सुचवण्यात आलेल्या शिफारशींपैकी ४४ शिफारशी नामंजूर करण्यात आल्या तर १४ शिफारशी विचारार्थ घेण्यात आल्या. या १४ बदलांसह आता वक्फ बोर्ड विधेयकाचा सुधारित मसुदा केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजूर केला आहे. आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल, असं सांगितलं जात आहे.

संयुक्त संसदीय समितीमध्ये सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटकपक्षांच्या सदस्यांनी एकूण १४ शिफारशी केल्या, तर विरोधातील इंडिया आघाडीच्या सदस्यांनी ४४ बदल या विधेयकात सुचवले होते. मात्र, वक्फ बोर्ड विधेयकात विरोधकांनी सुचवलेल्या सर्व ४४ शिफारसी नामंजूर करण्यात आल्या आहेत. तर सत्ताधारी एनडीएच्या सदस्यांनी सुचवलेल्या १४ शिफारसी मंजूर करण्यात आल्या आहेत. २७ जानेवारी २०२५ रोजी संयुक्त संसदीय समितीनं या शिफारशी मंजूर केल्या होत्या. आता केंद्रीय मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळाली आहे.

१० मार्चपासून अधिवेशनाचा दुसरा टप्पा



येत्या १० मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. याच काळात विधेयकाचा सुधारित मसुदा संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल. यात समाविष्ट १४ सुधारणांमध्ये वक्फ बोर्डाची मालमत्ता संकेतस्थळावर नोंद करण्यासाठीच्या सहा महिन्यांच्या मर्यादेत सूट देणे, मालमत्ता वक्फ बोर्डाची आहे की सरकारची हे ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडून सरकार नियुक्त अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे आणि मुस्लीम कायदे व तत्त्वांचं ज्ञान असणाऱ्या एका व्यक्तीची वक्फ लवादात नियुक्ती करणे या तीन महत्त्वाच्या सुधारणा मानल्या जात आहेत.

दरम्यान, संसदेतील सत्ताधाऱ्यांचं संख्याबळ आणि मतदानाची आकडेमोड पाहाता भारतीय जनता पक्षाला हे विधेयक मंजूर होईल असा विश्वास वाटत आहे. भाजपाकडे लोकसभेत २४० खासदार आहेत. या २४० मतांसह तेलुगु देसम पक्षाचे १६ तर जदयूचे १२ खासदार विधेयकाच्या बाजूने मतदान करतील,. याव्यतिरिक्त लोजपच्या ५ खासदारांची मतंही विधेयकासाठी महत्त्वाची ठरतील. याशिवाय रालोद (२), जनता दल सेक्युलर (२) आणि अपना दल (१) ही मतंही विधेयकाच्या बाजूने असतील.

दरम्यान, वक्फ बोर्ड विधेयकाचा अभ्यास करणाऱ्या संसदीय समितीच्या कामकाजावर विरोधी पक्षांकडून टीका केली जात आहे. कामकाजावेळी विहीत पद्धत पाळली गेली नाही, एकाधिकारशाही पद्धतीने कारभार केला गेला असा आरोप विरोधकांनी केला आहे. त्याचवेळी सत्ताधारी भाजपा व समिती अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी हे आरोप फेटाळले आहेत.

# सर्व बसेसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस अनिवार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावर दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दरम्यान या प्रकरणातील आरोपी अद्यापही फरार असून, त्याच्यावर एक लाख रुपयांचे बक्षिस जाही करण्यात आले आहे. पुण्यात घडलेल्या या घटनेनंतर एसटी प्रवास करताना महिलांच्या सुरक्षिततेबाबत मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, महिला प्रवाशांमध्येही या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशात महिला प्रवाशांच्या सुरक्षितते संदर्भात एस.टी महामंडळाची महत्त्वाची बैठक आज मंत्रालय येथे पार पडली. या बैठकीनंतर महिला प्रवशांच्या सुरक्षितेसाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये सीसीटीव्ही आणि जीपीएस यंत्रणा बसवण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.



### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

मंत्रालयात एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीनंतर मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, आमच्या सर्व लाडक्या बहिणींना परिवहन मंत्री म्हणून मी आवाहन करतो की, घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. महाराष्ट्रात कुठेच अशी घटना घडता कामा नये. लाडक्या बहिनींना परिवहन मंत्री म्हणून माझी विनंती आहे की, तुम्ही पूर्वी ज्या पद्धतीने एसटी प्रवास करत होता तसाच तुमचा प्रवास सुरू ठेवा. प्रवाशांच्या सुरक्षतेसाठी आम्ही आजच्या बैठकीत सर्व बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि जीपीएस ट्रॅकिंग सिस्टम बसवण्याचे निर्देश दिले आहेत. याचबरोबर पुढील काळात एसटी बसेस आणि स्थानकांवर एआयचा वापरही करण्यात येणार आहे.

बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

सर्व बसेसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस अनिवार्य करणार, सुरक्षा रक्षकांमध्ये महिलांची संख्या वाढवण्यावर भर दिला जाणार, सर्व बस डेपोचे ऑडिट करण्यात येणार, परिवहन विभागात आयपीएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय, एसटी आगारातील भंगार वाहने १५ एप्रिल पर्यंत हटवण्यात येणार, शक्ती कायद्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येईल,बस डेपोत स्वच्छतेला प्राधान्य देणार

पुण्यातील बलात्कार प्रकरणातील आरोप आरोपी दत्तात्रेय रामदास गाडे (३७) याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. त्याला शोधण्यासाठी पुणे पोलिसांनी १३ पथकांची स्थापना केली आहे. मंगळवारी सकाळी घडलेल्या घटनेपासून तो फरार आहे. याचबरोबर त्याच्याबद्दल माहिती देणाऱ्याला १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार असल्याची माहिती, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पीटीआयला दिली आहे.



# संतोष देशमुख हत्या, वाल्मीक कराडकडून खंडणी प्रकरणामध्ये दोषारोपपत्र दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या, वाल्मीक कराडकडून अवादा कंपनीकडे मागण्यात आलेली २ कोटींची खंडणी, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी (मकोका) या तिन्ही प्रकरणातील सुमारे १४०० पानांचे दोषारोपपत्र राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून विशेष मकोका न्यायालयात दाखल केले. या माहितीला एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याने दुजोरा दिला आहे. तर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनीही वरील माहिती माध्यमांसमोर बोलताना दिली.

उपरोक्त तिन्ही गुन्हे हे केज पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी विशेष तपास समिती (एसआयटी), राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून तपास व न्यायालयीन समिती, अशा तीन यंत्रणा नियुक्ती करण्यात आल्या आहेत. तर २६ फेब्रुवारी रोजी विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांना नियुक्त केले आहे. ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात सुदर्शन घुले, विष्णू चाटे, जयराम चाटे, महेश केदार, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे, प्रतीक घुले या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल आहे. याच सात जणांविरुद्ध जातिवाचक शिवीगाळ केल्याचाही एक स्वतंत्र गुन्हा दाखल आहे. यातील सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे व सुधीर सांगळे यांना २ जानेवारीला फरार घोषित करण्यात आले. तर ५ जानेवारी रोजी जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले व विष्णू चाटे यांना अटक करून १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.

# अध्यापकांच्या भरती प्रकियेस मान्यता; नवीन कार्यपद्धतीचा होणार अवलंब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता येण्यासाठी यापुढे राज्यात अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब होणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यपाल तथा कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक क्रेडेन्शियल आणि त्यांची मुलाखतीमधील कामगिरी गृहीत धरण्यात येणार आहे. या दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण (वेटेज) तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण (वेटेज) देण्यात येणार आहे. एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र असतील. अध्यापन क्षमता अथवा संशोधन प्राविण्य यांचे मुल्यमापन परिसंवाद अथवा व्याख्यान प्रात्यक्षिक अथवा अध्यापन आणि संशोधन यामधील नवीनतम तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवरील चर्चा या बाबी मुलाखतीच्या टप्प्यावर विचारात घेण्यात येतील. निवड समितीच्या बैठकांचे दृक-श्राव्य चित्रिकरण करण्यात येणार आहे. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दृक-श्राव्य चित्रिकरण, बैठकीला उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने सीलबंद करण्यात येईल.

### अधिकाऱ्यांनी लोकाभिमुखता, गतिशीलता आणि पारदर्शकता यावर भर द्यावा

### १०० दिवसांच्या आराखड्यादरम्यान उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

# एआयच्या सहाय्याने सुप्रशासन राबवावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : लोकाभिमुखता, गतिशीलता आणि पारदर्शकता या सुप्रशासनामध्ये अतिशय महत्त्वाच्या बाबी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) येत्या काळात सर्वच क्षेत्रात मोठा बदल घडून येणार असून सुप्रशासन राबविताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे १०० दिवसांच्या आराखड्यानुसार आतापर्यंत उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, त्या योजनांचा सर्वसामान्यांना सुलभतेने लाभ मिळावा या उद्देशाने प्रत्येक विभागाने १०० दिवसात करावयाच्या कामांचा कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ डिसेंबर २०२४ रोजीच्या बैठकीत दिले होते. या आराखड्यानुसार होत असलेल्या कामांचा मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, क्षेत्रीय अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. तर ६,८५४ अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रमच होय. तालुका स्तरापर्यंतच्या अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती.

विविध विभाग आणि पातळीवर उत्कृष्ट काम करीत असलेल्या १५ विभागांच्या कामांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. नाविन्यपूर्ण काम केलेल्या अधिकारी आणि कार्यालयांचे कौतुक करून त्यांना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मंत्रालयापासून गाव पातळीपर्यंत विविध कार्यालयांमधील सर्व अधिकाऱ्यांनी नागरिकांना सेवा सुविधांचा लाभ सुलभतेने मिळवून देण्यासाठी तसेच त्यांचे समाधान होईल यासाठी प्रयत्न करावेत. सुप्रशासन असेल तेथे गुंतवणूक वाढते. महाराष्ट्र हे यादृष्टीने अग्रेसर राज्य असून यामध्ये आणखी वाढ होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आराखड्यानुसार शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतर विभाग आणि जिल्हा पातळीवर या कामांचे समीक्षण आणि मूल्यमापन केले जाईल. त्या आधारावर उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना १ मे रोजी सन्मानित केले जाईल. त्याचबरोबर ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळवणाऱ्या विभागांची नकारात्मक दखल घेतली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

प्रभावी कार्यवाहीसाठीचे मुद्दे

शंभर दिवसांच्या आराखड्यानुसार प्रभावी कार्यवाही करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ, नागरिकांचे सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, गुंतवणूक प्रसार, कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, ई ऑफिसचा वापर, नाविन्यपूर्ण उपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदी मुद्दे ठरवून देण्यात आले होते.



राज्यातील ३६ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ३६ जिल्हाधिकारी यांच्यामधून विभागीय आयुक्त पातळीवर छाननी करून प्रत्येकी सहा जणांची निवड करण्यात आली. त्यानंतर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी २ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची तर २ जिल्हाधिकाऱ्यांची महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी निवड केली. २२ महानगरपालिका आयुक्तांमधून प्रशासनामार्फत ६ आयुक्तांची छाननी करण्यात येऊन नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी त्यापैकी २ आयुक्तांची निवड केली. ११ पोलिस आयुक्तांमधून गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी ४ आयुक्तांची छाननी केली ज्यामधून अपर मुख्य सचिवांनी एका पोलिस आयुक्तांची निवड केली. त्याचप्रमाणे सहा विभागीय आयुक्तांमधून महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी एका विभागीय आयुक्तांची निवड केली.

याचप्रमाणे सहा पोलिस परीक्षेत्रांमधून एका पोलिस महानिरीक्षकांची पोलिस महासंचालकांनी निवड केली. ३४ जिल्हा पोलिस अधीक्षकांमधून महानिरीक्षकांनी आठ पोलिस अधीक्षकांनी छाननी करून त्यापैकी गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी दोन अधीक्षकांनी निवड केली. सर्व आयुक्त / संचालक यांमधून यशदाच्या महासंचालकांनी सहा आयुक्त / संचालकांची छाननी केली ज्यामधून मुख्य सचिव यांनी दोन आयुक्त / संचालकांची निवड केली. तर सर्व विभागांच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांमधून मित्रा च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सहा सचिवांची छाननी केली ज्यामधून उत्कृष्ट काम केलेल्या दोन सचिवांची निवड मुख्य सचिवांनी केली.

उत्कृष्ट कार्य केलेले १५ विभाग आणि कार्यालये

१) पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर २) पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा ३) विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, छत्रपती संभाजी नगर ४) बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई ५) गृह विभाग मंत्रालय ६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ७) ठाणे महानगरपालिका ८) जिल्हा परिषद कार्यालय, धुळे ९) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर १०) जिल्हा परिषद कार्यालय, चंद्रपूर ११) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव १२) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे १३) आदिवासी आयुक्त कार्यालय १४) वैद्यकीय शिक्षण आयुक्त कार्यालय आणि १५) मृद व जलसंधारण कार्यालय, मंत्रालय यांचा समावेश आहे.

## संपादकीय....

### सुधारित मंजुरी

वक्फ बोर्ड विधेयकावरून गेल्या काही दिवसांपासून चर्चा चालू आहे. हे विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात संसदेत मांडण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. समितीकडून सुचवण्यात आलेल्या शिफारशींपैकी ४४ शिफारशी नामंजूर करण्यात आल्या तर १४ शिफारशी विचारार्थ घेण्यात आल्या. या १४ बदलांसह आता वक्फ बोर्ड विधेयकाचा सुधारित मसुदा केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजूर केला आहे. आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल. संयुक्त संसदीय समितीमध्ये सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटकपक्षांच्या सदस्यांनी एकूण १४ शिफारशी केल्या, तर विरोधातील इंडिया आघाडीच्या सदस्यांनी ४४ बदल या विधेयकात सुचवले होते. मात्र, वक्फ बोर्ड विधेयकात विरोधकांनी सुचवलेल्या सर्व ४४ शिफारसी नामंजूर करण्यात आल्या आहेत. तर सत्ताधारी एनडीएच्या सदस्यांनी सुचवलेल्या १४ शिफारसी मंजूर करण्यात आल्या आहेत. २७ जानेवारी २०२५ रोजी संयुक्त संसदीय समितीनं या शिफारशी मंजूर केल्या होत्या. आता केंद्रीय मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळाली आहे.

## फुल पाखरे गेली ती कुठे भेटतील? (ललित लेख-एक अनुभव निवेदन)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घर ही ही ओढ असते. तिथे समाधान मिळते. तिथे शांती मिळते. तिथे प्रेमाची माणसे भेटत असतात .घरात सर्व काही सुखदुःखाच्या प्रवासाचा इथेच सतत प्रारंभ होतो आणि विकास होतो. घर ही अभिमानाची ,समृद्धीची गोष्ट पण माणसे मानतात .सुखाचे घर, समाधानाचे घर नीत्यांचे आई वडील यांचे घर आनंदाचे घर हे निर्माण करावयाची गोष्ट असते . ती भावनानि सजवावयाची गोष्टआसते .रंगीबेरंगी घर आणि सौंदर्यात्मक रचनावादी घर ही घरांची एक हव्यासाची निर्मितीची गोष्ट मध्यमवर्गीयांच्या जीवनात झाली आहे. घर ही एक स्वायत्त गोष्ट आहे स्वाभिमानाची गोष्ट आहे आणि व्यक्तीच्या जीवनाच्या यशाची ती.खुण पण छोटीशी आहे. क्षमा पूर्वक. वाटते ती जास्त मानता कामा नये.

भारतीयांच्या मोठेपणाची परिमाणे श्रीमंतीची लक्षणे आणि त्यासाठीची गाडी घर आणि उंची कपडे दागिने ही लक्षणे आहेतच ही कित्येक प्रमाणात वाढतच आहेत. की हा हव्यासा ची गोष्ट प्रत्येकाला बाळगण्याचा संपत्ती अधिकार आहे, आणि त्यातही जीवनाचे काही अंश सुखाचे सापडतात .हे खरेच घरातील माणसांची वर्दळ, माणसांचा आदर ,माणसांचे एकमेकाबद्दलचे कष्टत जीवन जगणे हे महत्वाचे घरपण आहे. घर माणसासाठी आहे .माणूस घरासाठी नाही. हे सूत्र बऱ्याच वेळा विसरले जाते ,आणि त्यामुळे घरातील या आनंदाच्या छोट्या छोट्या गोष्टी कृती आणि रचना दुर्लक्षित होतात. प्रत्येक घरात फुलझाडे अंगण कुंड्या आणि त्यातील फुले ही मोठी सार्वजनिक त्या घरातील सर्वांच्या आ स्तेची व आ सक्तीची मन घेणारी गोष्ट असते.

तसे माझे प्रिय बापू हे पोवई नाक्यावरील नजीकचे छोटे घर थोडे अंगण होते २६ वर्षांपूर्वीचे हे अंगण इथे थोडी छोटी झाडे होती. फुलझाडे होती या फुल झाडांच्याकडे नियमित फुलपाखरे येत असत. सेवानिवृत्तीनंतर एक छंद लागला होता. सव्वा बारा ते दीड या दरम्यान तीन ते सात फुलपाखरे या बागेत येत असत, आणि त्यांचे निरीक्षण करावे. त्यातील एक पिवळे, काळे तीन आणि त्यांचे साधारण एक ते दीड तास फुलांवर इकडून तिकडे जाणे पानांच्या वर बसणे ,पुन्हा वर भिरकावणे .पुन्हा खाली येणे. हे सगळे पाहण्यात गेली २०१६ पासून रमलो आहे, पण नुकतेच ही फुलझाडे काढण्यात आली आणि फुलपाखरे लुप्त झाली. आता ती फुलपाखरे कुठे गेली? सात दिवस येत नाहीत. त्यामुळे माझे आणि त्यांचे फुलपाखराचे मन नाते जुळत नाही. फुलपाखरे येणे. कमी झाले. भेटणे नाही. दिसणे नाही. तसा हा फुलपाखरांचा छंद रहिमतपूर येथीलप्राथमिक शाळा क्रमांक एक या कमांडलू नदीकाठच्या ओढ्याच्या;काठावर हा लागलेला छंद होता आणि आहे. तो आजही टिकून आहे. चालताना फिरताना सर्वत्र फक्त सभोवताली कुठे फुलपाखरे दिसतात. त्यांचे पंख त्यांचे हालचाल त्यांचे सगळे सतत इकडून तिकडे जाणे पहात राहणे. हा एक नात्याचा अनुभव निसर्गाशी जोडण्याचा आंतरिक स्वयं केलेला आनंदी प्रयत्न आज पर्यंत टिकून आहे, पण स्वतःच्या बागेतील फुलपाखरे गेली म्हणजे फुलपाखरे संपली असे नाही. हेही कळते मात्र सहज लगत फुलपाखरे भेटत असत ती भेटणार नाहीत. ही खंत गेली दोन दिवस खूप मनाला बोचनी लागून राहिली आहे.

पण मनाची रम्यता ही निसर्ग नात्यात आहे. निसर्गाचे उत्स्फूर्त ऋतुचक्र आणि त्यातील सगळा गतिमान आणि अनियमित व्यवहार याचे नुसते निरीक्षण करणे. त्यात स्वतःलाच रमवणे यातून काही एक आंतरिक समाधान मिळते. सर्व बाह्य घटक विरून जातात. मन निरभ्र होते हा फुलपाखराच्या निरभर व निरपेक्ष नात्याचा संबंध गेलीत आठ दिवस तुटला आहे त्यामुळे त्या काळ्या रंगाच्या लवलव पंखाच्या आणि गतिमान गिरक्या घेणाऱ्या फुलपाखराच्या मित्रांची आठवण येते फुलपाखरांसाठी आता काय करायचे? याचा विचार करू लागतो. तेव्हा आपली निरीक्षण करणारे मन ही सुद्धा अ व्यवहारी वेडेपणाची गोष्ट आहे. हेही प्रतीत होते .पण लवलवणारे तिरतीरणारी ती फुलपाखरे सतत पुन्हा येतील का ही मात्र अंतरीक अस्वस्थता छळते आहे. म्हणून फुलपाखरांच्या आठवणीत पुन्हा माझे मन गुंतते आहे.

**– शिवाजी राऊत, सातारा**

## मराठा वॉरियर्स ग्रुप, सैनिक टाकळी तर्फे जानकी वृद्धाश्रम येथे भेट व मदत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : मराठा वॉरियर्स ग्रुप ,सैनिक टाकळी या ग्रुप मार्फत सैनिक टाकळी मध्ये शिवजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला .

गेल्या १८ वर्षापासून ची परंपरा जोपासत या मंडळांने शिवजयंती निमित्त वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवले.

त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २६ फेब्रुवारी रोजी ग्रुपच्या सर्व सभासदांनी आपापल्या परीने मदत करून जानकी वृद्धाश्रमात भेट देऊन तेथे जीवनाशक्य वस्तूंचा पुरवठा केला.

या मंडळाचे वैशिष्ट्य आहे की ते दरवर्षी शिवजयंतीनिमित्त वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवतात व वृद्धाश्रम अनाथाश्रमाला मदत करतात. मंडळाचे हे कार्य पाहून संपूर्ण सैनिक टाकळी गावातून त्यांचे कौतुक होत आहे. या कार्यक्रम प्रसंगी मंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते.

डुबेरे विद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

## मराठी भाषेच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक : मुख्याध्यापक वाजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलीत डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन अर्थात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर जेष्ठ शिक्षक डी. एच. जाधव,अलका काळोगे,मंजुषा पडवळ,विनिता देवरे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .राजेंद्र गांगुर्डे यांनी




मराठी भाषेचे महत्त्व, प्रचार ,प्रसार व कुसुमाग्रज यांच्याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी बोलताना रामदास वाजे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात व व्यवहारात मराठी प्रमाण भाषेचा वापर करावा. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे. विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान केली होती. विद्यार्थ्यांनी मराठी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या वतीने मानसी जाधव, सायली आव्हाड,स्वरांजली सहाणे, प्राची चव्हाण, दुर्वा वारुंगसे,प्रणिती कडभाने,गौरी वाजे,रेणुका वारुंगसे, समिक्षा माळी,राजश्री उघडे यांनी मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक व सूत्रसंचालन जयश्री गोहाड यांनी केले.आभार रेखा खंडीझोड यांनी मानले. यावेळी मारुती डगळे, रेवणनाथ कांगणे, सुनिल ससाणे,डी.ए.रबडे एस.बी.गुरुळे,सुदाम वारूंगसे, सोमनाथ माळी,रवि गोजरे, किशोर शिंदे,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,ज्ञानेश्वर कडभाने, आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शेतीपूरक ई-वाहनामुळे शेतकऱ्यांना होणार लाभ : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाने आपल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी आता इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात केला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी आवश्यक असलेल्या या ई वाहनांचा उपयोग करणे सोपे होणार आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि वातावरणातील प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर केले होते. मात्र, सुरुवातीला या धोरणात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश नव्हता. त्यावर विचार करून, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी या वाहनांचा समावेश धोरणात केला आहे. यासंबंधीच्या शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक काढण्यात आले आहे.

शेतकऱ्यांसाठी फायदे

शेतीकामांसाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केल्यास शेतकऱ्यांचा इंधनावरील खर्च कमी होईल आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक प्रभावही कमी होईल. यामुळे वातावरणातील वायू प्रदूषणात घट होईल आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या देखील फायदा होईल. याशिवाय, इलेक्ट्रिक वाहने जास्त वेळ चालतात, देखभाल खर्च कमी होतो आणि कमी इंधनाची आवश्यकता भासते.

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणानुसार, बॅटरीवरील वाहनांची खरेदी करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा फायदा आता शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटर खरेदी करतांना होईल. राज्य सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय जारी केला आहे.

या धोरणामुळे फक्त शेतकऱ्यांना फायदे होणार नाहीत, तर पर्यावरण व वातावरणीय बदलाचा प्रभावही कमी होईल. इलेक्ट्रिक वाहने प्रदूषण कमी करण्यास मदत करतील, ज्यामुळे स्वच्छ हवा मिळवता येईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची आवड निर्माण होईल, जेणेकरून पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची स्वीकृती वाढेल. या धोरणामुळे महाराष्ट्र राज्यात शेतीच्या कामामध्येही इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढेल आणि शेतकऱ्यांना अधिक सुलभ आणि किफायतशीर साधने मिळतील, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## रेल्वे स्थानकांच्या मराठी नोंदीच चुकीच्या

मुंबई : एकीकडे मराठी भाषा गौरव दिनी मध्य रेल्वेमार्गावरील स्थानके मराठी अभिमान गीताने दुमदुमत असली तरी दुसरीकडे स्थानकांची नावे चुकीची लिहिली जात आहेत. त्याबाबत प्रवाशांनी वारंवार तक्रारी करून देखील नावांत बदल झालेला नाही. मध्य रेल्वेच्या मूळ दस्तऐवजातच स्थानकांच्या मराठी नावांची नोंद चुकीची असल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ट्रान्स हार्बर मार्गावरील ‘ऐरोली’, ‘रबाळे’, ‘घणसोली’, ‘कोपरखैरणे’ या स्थानकांची नावे अनुक्रमे ‘ऐरावली’, ‘राबाडा’, ‘घनसोली, ‘कोपर खैर्ना’ अशी लिहीली जात आहेत.

मध्य रेल्वेच्या अख्यारितील ट्रान्स हार्बर मार्गिका नोव्हेंबर २००४ रोजी सुरू करण्यात आली. त्यानंतर २००७ साली रबाळे स्थानक सुरू झाले. ट्रान्स हार्बर मार्गिका सुरू झाल्याने ठाणे ते नवी मुंबईला जाणारा वेगवान आणि स्वस्त मार्ग सुरू झाला. परंतु, ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे स्थानकांची नावे चुकीच्या पद्धतीने उच्चारली जातात. तसेच चुकीच्या पद्धतीने लिहून दर्शनी भागी लावण्यात येतात. त्यामुळे त्या गावांच्या मूळ मराठी नावांचा अपभ्रंश होत आहे. याबाबत समाज माध्यमांवरून अनेक प्रवाशांनी तक्रारी केल्या आहेत. स्थानकांच्या नावात दुरूस्ती करण्याची मागणी केली आहे. परंतु, मध्य रेल्वेने त्या तक्रारींवर कोणत्याही प्रकारे कार्यवाही न केल्याने स्थानकांची चुकीची नावे अंगवळणी पडत आहेत. हे अन्यायकारक आहे, असे मत प्रवाशांनी व्यक्त केले. माहिती अधिकारी कार्यकर्ते अक्षय महापदी यांनी ठाणे ते वाशी रेल्वेमार्गावरील स्थानकांच्या नावांची मराठी आणि इंग्रजीमधील अधिकृत नोंद माहिती अधिकारांतर्गत मागितली होती. मध्य रेल्वेच्या संबंधित विभागाने माहितीनुसार ठाणे, दिघा गाव, ऐरावली, राबाडा, घनसोली, कोपर खैर्ना, तुर्भे, सानपाडा, वाशी अशी स्थानकांची नोंद असल्याचे आढळले आहे. त्यामुळे ऐरोली रेल्वे स्थानकाचे नाव ‘ऐरावली’, रबाळे रेल्वे स्थानकाचे नाव ‘राबाडा’, घणसोली रेल्वे स्थानकाचे नाव ‘घनसोली’ आणि कोपर खैरणे रेल्वे स्थानकाचे नाव ‘कोपर खैर्ना’ असे चुकीच्या पद्धतीने लिहिले जात आहे. परिणामी, लोकलमधील सूचना फलकावर व इतर ठिकाणी रेल्वे स्थानकांची चुकीची नावे प्रवाशांच्या दृष्टीस पडत आहेत.

ठाण्यात ३५ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेचा दिमाखदार शुभारंभ — उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महाराष्ट्र पोलीस दलाची शारीरिक क्षमता आणि स्पर्धात्मक भावना दाखविण्याची संधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : पोलीस विश्वात होणारी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा महाराष्ट्राची ‌‌महा ऑलिम्पिक‌‌ असून महाराष्ट्र पोलीस दलाची शारीरिक क्षमता आणि स्पर्धात्मक भावना दाखविण्याची ही एक संधी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

येथील साकेत मैदानावर ३५ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२५ चा दिमाखदार शुभारंभ उपमुख्यमंत्री आणि ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.१२ वर्षांनंतर ठाणे पोलीस आयुक्तालयाने आयोजित केलेला हा कार्यक्रम राज्याच्या क्रीडा दिनदर्शिकेतील एक महत्त्वाचा क्षण आहे.

या दिमाखदार सोहळ्याला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, गृहराज्यमंत्री योगेश कदम, महाराष्ट्र पोलीस महासंचालक (डीजीपी) रश्मी शुक्ला, तसेच राज्यभरातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका (टीएमसी) आयुक्त सौरभ राव, आमदार संजय केळकर आणि आमदार निरंजन डावखरे यांचीही विशेष उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र पोलीस कर्मचाऱ्यांच्या क्रीडा वृत्ती आणि समर्पणाचे कौतुक केले. त्यांनी डीजीपी रश्मी शुक्ला यांचा लाडकी बहीण असा उल्लेख करीत खेळाडूंना जागतिक स्तरावर आपली ताकद आणि शिस्त दाखवण्याचे आवाहन केले.

पोलिसिंगमध्ये तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित करताना श्री.शिंदे म्हणाले, पोलिस दलाच्या ध्येयाचे पालन करायचे असेल तर तंदुरुस्तीला पर्याय नाही. खेळ मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारतात, तसेच अधिकाऱ्यांमध्ये सांघिक भावना, नेतृत्व आणि आत्मविश्वास वाढवितात, असेही त्यांनी नमूद केले.

न्यायालयात खटल्यांचे दोषसिद्धीचे प्रमाणही समाधानकारक असून, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी शासन सर्वोत्तम सुविधा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.




याप्रसंगी चांगल्या क्रीडा सुविधांची गरज ओळखून शिंदे यांनी ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना साकेत मैदानावर सिंथेटिक ट्रॅक आणि उच्च मास्ट लाइटिंग उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. या सुधारणांचा ठाणे पोलीस आणि स्थानिक खेळाडूंना फायदा होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

श्री.शिंदे यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देताना म्हटले की, जिंकणे किंवा हरणे महत्त्वाचे नाही; प्रत्येक सहभागी विजेता आहे. महाराष्ट्र पोलीस खिलाडी नंबर १ आहेत आणि ही स्पर्धा जगाला ते सिद्ध करण्याची सर्वोत्तम संधी आहे. त्यांनी ऑल इंडिया पोलीस स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्राच्या फोर्स वन संघाचेही कौतुक केले, ज्यांनी चक्रव्यूह अर्बन वॉरफेअर ट्रॉफी आणि चक्रव्यूह जंगल वॉरफेअर ट्रॉफी जिंकली. महाराष्ट्र पोलीस कर्मचारी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करीत राहतील, असा विश्वास श्री.शिंदे यांनी व्यक्त केला. भारत देशातील सर्वोत्तम दलांमध्ये स्थान टिकवून ठेवण्यासाठी शासन सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

आपल्या भाषणाचा समारोप त्यांनी रडण्याने नशीब बिघडते, हिंमतीने ते घडते. हरल्याने कोणी फकीर होत नाही आणि जिंकल्याने अलेक्झांडर होत नाही. या प्रेरणादायी पंक्तींनी केले.

ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. दि.२२ फेब्रुवारी ते १ मार्च २०२५ या कालावधीत होणाऱ्या या क्रीडा स्पर्धेत १८ विविध खेळांचा समावेश आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील एकूण १३ संघ सहभागी झाले असून २ हजार ९२९ खेळाडू (२ हजार ३२३ पुरुष आणि ६०६ महिला) विविध गटांमध्ये स्पर्धा करणार आहेत. दि.१ मार्चपर्यंत ही स्पर्धा सुरू राहणार असून, पोलीस कर्मचारी या प्रतिष्ठित स्पर्धेत शिस्त, सहनशक्ती आणि क्रीडावृत्तीचे प्रदर्शन करीत अव्वल स्थानासाठी स्पर्धा करीत आहेत. दि.१ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या या स्पर्धेच्या समारोप समारंभाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# स्वेरीत २ मार्च रोजी पत्रकारांसाठी राज्यस्तरीय 'पत्रकारिता काल आज आणि उद्या'या एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन

## स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांची माहिती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'पत्रकार'हे समाजाला ताकत देण्याचे व कमी पडेल तिथे जागृती करण्याचे काम अहोरात्र करत आहेत ही बाब अभिनंदनीय आहे. लोकशाही देशात पत्रकारितेला'चौथा स्तंभ'म्हणून गौरविले जाते. हा स्तंभ येणाऱ्या बदलत्या काळामध्ये समाज परिवर्तनात मैलाचा दगड ठरण्यासाठी त्यास स्वतःचे सामर्थ्य वाढविले पाहिजे. यासाठी एकत्र बसून वारंवार चिंतन करण्याची गरज आहे. त्याचाच एक भाग म्हणून'पंढरपूर प्रेस क्लब'आणि'स्वेरी'पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीमध्ये येत्या रविवारी,दि.०२ मार्च २०२५ रोजी'पत्रकारिता काल,आज आणि उद्या'या विषयावर समाजासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांसाठी राज्यस्तरीय दुसऱ्या एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.'अशी माहिती स्वेरीचे सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे व स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी दिली.

सदर कार्यशाळेविषयी स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे सविस्तर माहिती देताना म्हणाले की, 'समाजाला सामर्थ्य देण्याचे काम पंढरपूरात अनादी काळापासून चालत आले आहे.'जेंव्हा नव्हते चराचर,तेंव्हा होते पंढरपूर'असे म्हटले जाते. त्याच उद्देशाने पंढरपूर नगरीच्या कुशीत गोपाळपूरच्या माळरानावर स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँण्ड रिसर्च इन्स्टिट्युट,पंढरपूर या संस्थेने सन १९९८ साली'अभियांत्रिकी महाविद्यालय'हे लहानसे रोपटे लावले. आज हा परिसर आपणा सर्वांचे योगदान मिळाल्यामुळे बहरलेला दिसतो आहे तसेच महाविद्यालयाने'एन.बी.ए.', 'नॅक'अशी मानांकने प्राप्त केलेली आहेत. मजल-दरमजल करत अनेक अवघड टप्पे स्वेरीने यशस्वीपणे पादाक्रांत केले आहेत,याचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. स्वेरीने गुणवत्तेमध्ये भरारी घेतल्याचे आपण पाहत आहोतच. संपूर्ण महाराष्ट्रामधील अभियांत्रिकी शिक्षणाची सध्याची अवस्था पाहता'स्वेरी'ने घेतलेले परिश्रम आणि आज मिळालेले यश हे निश्चितच स्वागतार्ह आणि अभिनंदनीय आहे आणि हे सर्व करताना वेळोवेळी पत्रकार बंधूंचे सहकार्य लाभते. एकूणच स्वेरीच्या यशात पत्रकारांचे अनमोल योगदान आहे. हे सर्व करत असताना'पत्रकारिता'या संदर्भात सामाजिक विचारमंथन व्हावे या हेतूने पत्रकारांसाठी राज्यस्तरीय दुसऱ्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यापूर्वी पहिली कार्यशाळा दि.२८ ऑगष्ट २०१८ रोजी आयोजित केली होती. त्या कार्यशाळेस अदभूत प्रतिसाद लाभला होता आणि आता या दुसऱ्या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. येत्या रविवार,दि.०२ मार्च २०२५ रोजी आयोजिलेल्या कार्यशाळेत पहिल्या सत्रात सकाळी ८.३० ते ०९.३० ह्या वेळेत नोंदणी व चहा-पान होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या सत्रात सकाळी ९.३० वा एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या हस्ते या राज्यस्तरीय कार्यशाळेचे उदघाटन होणार असून यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर चे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभले आहेत.

दुसऱ्या सत्रात,परीसंवाद-१ मध्ये १०.३० ते ०१.३० मध्ये'पत्रकारीते समोरील आव्हाने आणि समाजातील सर्व घटकांचा पत्रकारिता या लोकशाहीतील चौथ्या स्तंभाबाबतीत हवा असलेला सहभाग'या विषयावर चर्चासत्र होणार असून यामध्ये एनडीटीव्ही मराठीचे सहसंपादक राहुल कुलकर्णी व साधना मासिकाचे संपादक विनोद सिरसट यांचा सहभाग असणार आहे तर याचे अध्यक्षस्थान एबीपी माझा चे मुख्य संपादक राजीव खांडेकर हे भूषविणार आहेत. त्यानंतर जेवणासाठी दुपारी १.३० ते ०२.३० अशी वेळ आहे. तिसऱ्या सत्रात,परिसंवाद-२ मध्ये दु. ०२.३० ते सा.५.३० दरम्यान'पंढरपूर व वारकरी संत साहित्य संदर्भातील पत्रकारांचे योगदान'या विषयावर चर्चा सत्र होणार असून यामध्ये'दैनिक सकाळ'चे संपादक श्रीराम पवार व'रिंगण'चे संपादक सचिन परब यांचा सहभाग असणार आहे. तर या सत्राचे अध्यक्षस्थान'महाराष्ट्र दिनमान'चे संपादक विजय चोरमारे हे भूषविणार आहेत. ही कार्यशाळा ही निशुल्क असून पत्रकारांनी याचा लाभ घ्यावा.'असे आवाहन'पंढरपूर प्रेस क्लब'व'स्वेरी'च्या वतीने केले आहे. या कार्यशाळेसंबंधी अधिक माहितीसाठी स्वेरीचे जनसंपर्क अधिकारी संतोष हलकुडे (९८५०२४२१५५) व स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार (९५४५५५३८८८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### थोडक्यात...



### पोलीस निरिक्षक यादव यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

वागदरी ( एस.के. गायक वाड ):

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक सचिन यादव यानी नुकतच आपल्या पदाचा पदभार स्विकारून ते नळदुर्ग पोलीस ठाणे येथे रुजू झाल्याने त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने त्यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला.

येथील पोलीस निरिक्षक गजेंद सरोदे यांची पोलीस प्रशासना कडून अचानक पणे तात्काळ बदली झाल्याने त्यांच्या जागी सचिन यादव यांची नियुक्ती करण्यात आली असून ते नळदुर्ग पोलीस ठाणे येथे रूजू झाले आहेत. त्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तुळजापूर तालुका शाखेच्या वतीने तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, उपाध्यक तथा जेष्ठ पत्रकार इरफान काझी यांच्या हस्ते यथोचित स्वागत पर सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार संघाचे एस.के. गायकवाड, शाम नागीले,किशोर धुमाळ, विजय पिसे, आरविंद लोखंडे आदी उपस्थित होते.

# दैनिक समर्थ गांवकरी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व वार्ताहर मेळावा - २०२५ उत्साहात संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/प्रतिनिधी : पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी आणि समाजप्रबोधन करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने दैनिक समर्थ गांवकरी तर्फे राज्यस्तरीय वार्ताहर मेळावा व पुरस्कार सोहळा - २०२५ भव्य स्वरूपात संपन्न झाला. हा सोहळा २४ फेब्रुवारी २०२५ रोजी हॉटेल साई संगम, शिर्डी येथे पार पडला. या कार्यक्रमात राज्यभरातील नामांकित पत्रकारांनी उपस्थिती लावली.

समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांना जीवन गौरव सन्मान २०२५ समाजसेवेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नानजीभाई ठक्कर यांना जीवन गौरव सन्मान २०२५ प्रदान करण्यात आला. त्यांच्या समाजहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला.

कार्यक्रमाची वैशिष्ट्ये:

पत्रकारांना गौरव चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकारांसाठी प्रेरणादायी व्याख्यानांचे विशेष सत्र आयोजित करण्यात आले. पत्रकारितेतील नव्या ट्रेंड्स आणि आव्हाने यावर चर्चा करण्यात आली. स्नेहमेळावा आणि संवाद सत्राचे आयोजन, ज्यामुळे पत्रकार बांधवांना एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

उपस्थित वार्ताहरांना ओळखपत्र, डायरी, दिनदर्शिका आणि आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# सोलापूर येथे सनातन संस्थेच्या वतीने विविध ठिकाणी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सनातन संस्था ही अध्यात्माचा प्रसार करणारी संस्था आहे. समाजात धर्मजागृती करून समाजाला अध्यात्मविषयक मार्गदर्शन करणे यासाठी संस्था कार्यरत आहे. संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त शहरातील विवीध ठिकाणी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शेकडो शिवभक्त आणि मान्यवरांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिर येथील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध डॉ. अतुल वेलणकर आणि अबोली वेलणकर यांच्या हस्ते करण्यात आले. या

### ग्रंथ प्रदर्शनाला भाविकांचा भरघोस प्रतिसाद

प्रदर्शनाला भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली. तसेच सुप्रसिद्ध रेडिओलोजिस्ट डॉ. अंशू शर्मा, भाजप शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक राजकुमार पाटील, माजी नगरसेवक नागेश भोगडे, माजी महापौर सौ. शोभा बनशेट्टी, श्री. उदजयशंकर चाकोते इत्यादी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने खालील ठिकाणी ग्रंथप्रदर्शन लावण्यात आले. १. मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस. २. निळकंठेश्वर मंदिर, कन्ना चौक. ३. ओंकारेश्वर मंदिर, आय ग्रुप, जुना घरकुल. ४. मल्लिकार्जुन मंदिर, शेळगी. ५. मल्ल्या मंदिर, सिद्धरामेश्वर नगर, चखऊ, सोलापूर. ६. विरतपस्वी मंदिर, अक्कलकोट रोड, सोलापूर. ७. महादेव मंदिर उत्कर्षनगर, सोलापूर. ८. शिवमंदिर, विजयनगर, नवीन घरकुल रोड, सोलापूर.

# परंपरा अस्मिता व संस्कृतीचे प्रतीक मराठी भाषा : प्रा. डॉ. सुरेश जाधव

## निफाड मोरे महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भाषिक संपन्नता, मौलिक ग्रंथसंपदा, अखंड प्रवाहित असलेल्या भाषिक परंपरा या सर्व निकषांवर मराठी भाषेने आपली योग्यता सिद्ध केली असून, मराठी भाषेला साधारण १५०० वर्ष जुनी परंपरा लाभली आहे, त्यात १,२०,००० पेक्षा जास्त शब्द संग्रह असून ८०,००० हून अधिक शब्द मराठी विश्वकोशात आढळतात, निफाड तालुक्यातील शिरवाडे गावचे नाव उभ्या महाराष्ट्रातच नाही तर दिल्ली पर्यंत पोहचविणारे कवी कुसुमाग्रज आणि त्यांची साहित्य संपदा सर्वांसाठी अभिमानास्पद असून ह्या मातीचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारी ठरते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश यांनी केले.

क.ग.दा. मोरे निफाड महाविद्यालय येथे मराठी भाषा गौरव व कुसुमाग्रज जन्मदिवस या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बोलत होते, यावेळी त्यांनी निफाडचे संस्कृतिक व साहित्यिक महत्व विशद करताना, वेगवेगळ्या ग्रंथातील मूळ दाखले व संदर्भ श्रोत्यांसमोर ठेवत मराठी भाषेचे महत्व व मूळ हेतू विशद केला.

यावेळी प्रमुख वक्ते सुप्रसिद्ध कवी प्रशांत केंदळे यांनी आपल्या झाड, शिक्षक,निसर्ग,पुस्तक,प्रेम,आई, मराठी भाषा या चौफेर काव्य सादरीकरणाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत, गायलेल्या बाप नावाच्या कवितेने प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेत सर्वांच्या डोळ्यात पाणी तरळले.

मान्यवरांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली,मराठी भाषा पंधरवडा व वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम निमित्ताने आयोजित विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिक वितरण करण्यात आले.

प्रस्ताविकात डॉ.आर डी शिंदे यांनी या कार्यक्रमाचे हेतू व महत्त्व विशद केले, कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार श्रीमती सुनिता बोरडे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीततेसाठी डॉ. सुसान लॉरेन्सिया,डॉ.प्रवीण ढेपले,प्रा. योगेश कडलक,डॉ. सुरेखा जाधव,श्रीमती व्ही.बी. गीते,प्रा. ज्ञानेश्वर मोगल,प्रा. प्रवीण शार्दुल,प्रा.अतुल आहेर,रावसाहेब पवार,किरण वाघ,सोपान मोरे व सर्व प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले

## 'लेखक आपल्या भेटीला' उपक्रमांतर्गत कवी धनंजय सोनलकर यांचे विशेष व्याख्यान संपन्न

## कवी धनंजय सोलंकर यांचे प्रतिपादन

# कुसुमाग्रज शेतकरी, कामगार आणि समाजसेवक यांच्या भूमिकेतून साहित्यरचना करणारे युगप्रवर्तक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त झालेल्या साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमात कवी धनंजय सोलंकर यांनी कवी कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांच्या साहित्यिक वारसाचा आवर्जून उल्लेख करत मराठी भाषेतील मूल्याधारित साहित्यनिर्मितीचे महत्त्व रेखांकित केले. मराठी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांनी रुसा काम्पोनंट आठ फॅक्लटी एक्स्चेंज उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे हे होते.

कवी धनंजय सोलंकर यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्यातील प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, समाजप्रेम आणि माणुसकी हे तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांच्या भाषणात ते म्हणाले की, कुसुमाग्रज केवळ कवी नव्हते, तर ते शेतकरी, कामगार आणि समाजसेवक यांच्या भूमिकेतून साहित्यरचना करणारे युगप्रवर्तक होते. त्यांच्या कवितेतून युवकांना संघर्षाची प्रेरणा मिळाली. परस्त्रीला आई-बहीण मानणे हाच खरा पुरुषार्थ आणि ईश्वरी संकेत आहे. सोलंकरांनी स्वतःच्या साहित्यिक प्रवासाबद्दल सांगताना सामान्य माणसाचे जीवन, स्त्रीचे मातृत्व आणि गुरूजनांचे मार्गदर्शन यांना कवितेची प्रेरणा म्हणून उद्धृत केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रमेश शिंदे म्हणाले की, साहित्य हे भावनांच्या अभिव्यक्तीचे माध्यम असते. साहित्यामुळेच भाषा समृद्ध होते. मराठीचा गौरव म्हणजे तिच्या परंपरा आणि प्रयोगशीलतेचा समन्वय, विद्यार्थ्यांना भाषा आणि भावनांचा अभ्यास करण्याचे आवाहनही केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी करून दिला. प्रा. सारिका भांगे यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. सुमित साळुंखे, डॉ. बापूसाहेब घोडके, अमोल माने, अभिजीत जाधव, ओंकार नेहतराव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकळस, विविध विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी हे उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. हरीभजन कांबळे यांनी मानले.

थोडक्यात...

### विवाहितेचा छळ ; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) लग्नात आमचा मानपान केला नाही. सोने व हुंडा दिला नाही, यावरून विवाहितेचा छळ केल्याची घटना १७ जून २०१९ ते १५ मे २०२४ दरम्यान फिर्यादीच्या सासरी बोरामणी येथे घडली.




याप्रकरणी शिल्पा अनिल चव्हाण (वय-२८,रा.मिहोती. अशी विचारणा पतीने केली असता, तू कोण मला विचारणारा असे म्हणून पत्नीने पतीस शिवीगाळ करून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.तसेच इतर संशयित आरोपी यांनी घरात पडलेला लोखंडी रॉड हातात घेऊन फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केल्याची फिर्याद सिद्धाराम रघुनाथ माडगे (वय-३४,रा.स्वागत नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पत्नी वंदना सिद्धाराम माळगे,मेव्हणा लक्ष्मण व चुलत भाऊ मोरे (रा.लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान स्वागत नगर येथे घडली. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शेख हे करीत आहेत.

# पुणे-बारामती नंतर इंदापुरात कोयता गँग होतेय सक्रिय

## कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अपयशी ठरत असल्याची जनतेत चर्चा; पोलीस प्रशासन काय कारवाई करणार याकडे लागले सर्वांचेच लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव येथील युवक प्रशांत मोहन आरडे यांनी इंदापूर पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या फिर्यादीमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, प्रशांत मोहन आरडे हे वाघोली ता.माळशिरसवरुन कागदपत्रे घेवुन आपल्या गावी सायंकाळी सहाच्या सुमारास गावामध्ये आले असता घराजवळच प्रचंड मोठा आक्रमक जनसमुदाय त्यांना दिसला हा जनसमुदाय का एवढ्या मोठ्या संख्येने या ठिकाणी जमला आहे हे पाहण्यासाठी प्रशांत आरडे हे आपली गाडी रस्त्याच्या साईटला लावून तेथे पाहण्यासाठी गेले.

त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांचे बंधू सुशांत आरडे यांना त्या जनसमुदायांमधील स्वप्निल जगताप, निखिल बगाडे, स्वप्निल बगाडे ,समीर वाघमारे, प्रज्वल वाघमारे, रोहन भोसले, दीपक जगताप, प्रेम रणदिवे, अक्षय बापू आरडे, सुरज आरडे, धीरज पिंगळे,धीरज निरवणे, योगेश जाधव, सुमित जगताप यांच्यासह इतर काही अनोळखी युवक हातामध्ये कोयता, लोखंडी रोड, लाकडी दांडके, बॅट घेऊन मारहाण करत असल्याचे दिसले. यानंतर ते आपल्या भावाला वाचवण्यासाठी या जनसमुदायांमध्ये गेले आणि माझ्या भावाला मारहाण करू नका अशी विनवणी करू लागले परंतु हा जनसमुदाय खूपच बेभान आणि आक्रमक झालेला होता त्यांनी यांना जीवे मारण्याचा जणू काही विडाच उचलला होता असे हे युवक त्यांना मारहाण करत होते.

**यातील काही आरोपी हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असून यांच्यावरती इंदापूर, टेंभुर्णी,करमाळा पोलीस स्टेशनमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे समजते.यामुळे इंदापूर तालुक्यामध्ये पुन्हा दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासन संबंधितावर काय कारवाई करणार याकडे तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. सदर भांडणाचा व्हिडिओ सोशल मीडियावरती खूप मोठ्या प्रमाणामध्ये व्हायरल झाल्याने या गुन्हेगारांना नक्की कोणाचे अभय आहे याविषयी उलट-सुलट चर्चेला उधाण आले आहे.**



यानंतर तेथे काही ग्रामस्थ उपस्थित झाले व त्यांनी हे भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला परंतु हा जनसमुदाय कोणाचेच ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता यानंतर ते दोघेही बंधू आपला जीव वाचवण्यासाठी सैरावरा पळू लागले शेजारीलच असणारे बाळासाहेब खराडे यांच्या घरामध्ये आपला जीव वाचवण्यासाठी पळाले परंतु हा जनसमुदाय इतका आक्रमक झाला होता की या जनसमुदायाने बाळासाहेब खराडे यांच्या घराचे दरवाजे, खिडक्या पूर्णतः तोडून आत मध्ये प्रवेश करून या दोन्हींही युवकांना गंभीर स्वरूपाची मारहाण केली आहे.




मारहाणीमध्ये जखमी झालेल्या युवकांना इंदापूर येथील शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुंडलिक गावडे हे करत आहेत.

# अ.भा. मराठी साहित्य संमेलनात राजेंद्र सोमवंशीची बाप कविता सादर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नवी दिल्ली येथे नुकतेच संपन्न झाले असून या समेलनाचे उद्घाटन पंतप्रधान.नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते झाले यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरदचंद्र पवार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री .देवेंद्र फडणवीस , लोकसाहित्य व लोकसंस्कृती च्या अभ्यासक, जेष्ठ लेखिका संमेलनाच्या अध्यक्षा डॉ.तारा भवाळकर आदि मान्यवर उपस्थित होते. या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून निफाडचे भूमिपुत्र कवी राजेंद्र सोमवंशी यांना बहुमान मिळाला असून

राजेंद्र सोमवंशी यांनी आपली बाप ही गाजलेली कविता सादर केली.या कवितेचा आशय व सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी टाळ्या वाजवून दाद दिली.कवी संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव हे होते.यावेळी कवी संमेलनाच्या समन्वयक डॉ.संगीता शिंदे यांच्या हस्ते राजेंद्र सोमवंशी यांचा सन्मान करण्यात आला.



### निफाडचे कवींचा दिल्ली डंका

यावेळी साहित्य परिषद शाखा नाशिकरोड चे कोषाध्यक्ष ॲड.सुदाम सातभाई, साहित्य परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ.बी.जी.शेखर पाटील, माजी न्यायमूर्ती वसंत पाटील, सावानाचे कार्याध्यक्ष संजय करंजकर विश्वस्त गणेश बर्वे, मालपाठक, प्रा.सोमनाथ मुठाळ, ॲड.संगीता पाटील,युवा कवी प्रशांत केंदळे, रतन पिंगट, प्रशांत कापसे आदि मान्यवर उपस्थित होते.

याबद्दल कवी राजेंद्र सोमवंशी यांचे निफाडचे आ. दिलीप बनकर, मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर,एन.इ.आय.संसथेचे अध्यक्ष, प्रकाश वैशंपायन,माजी आमदार अनिल कदम, नगराध्यक्षा सौ.कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा.कुंदे , सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलाल चोरडिया, न्या.रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्य. विश्वस्त .वि.दा.व्यवहारे, अर्बन बँकेचे चेअरमन माओ.राजाभाऊ राठी, निफाड वि.का.से.संस्थेचे चेअरमन . शिवाजीराजे ढेपले, निफाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड.प्रविण ठाकरे, निफाड नागरी पतसंस्थेचे चेअरमन अशोक पोफळीया, माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी अभिनंदन केले आहे.

# टीजीआय ग्रुप कंपनीतर्फे नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड सुनीता तांबे यांना प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नाशिक/प्रतिनीधी : टीजीआय ग्रुप ऑफ कंपनीच्या अठराव्या वर्धापन दिनानिमित्त टीजीआय नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२५ हा पुरस्कार नाशिक माहेश्वरी भवन येथे लोणी येथील आर्ट ऑफ लिविंग च्या प्रशिक्षिका व समाजसेविका श्रीमती सुनीता तांबे यांना हा पुरस्कार महाभारतातील द्रोणाचार्य यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुरेंद्र सिंग पाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला श्रीमती सुनिता तांबे यांनी आर्ट ऑफ लिविंग चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या मार्गदर्शनाने गावा गावात शहरात शाळा कॉलेज अनाथ आश्रम वृद्धाश्रम पोलीस कर्मचारी शासकीय कर्मचारी अशा अनेक ठिकाणी जाऊन हजारो लोकांना जीवन जगण्याची कला शिकून त्यांच्या जीवनात बदल घडविले तसेच सामाजिक कार्यातून ग्रीन अँड क्लीन शिर्डीच्या माध्यमातून शिर्डी स्वच्छ अभियान वृक्षरोपण , बेटी बचाव अभियान, सेंद्रिय शेती अभियान अशा अनेक सामाजिक कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला याप्रसंगी टीजीआय ग्रुप ऑफ कंपनीचे संस्थापक श्री सुदर्शन कदम, राज्य जीएसटीचे सहआयुक्त श्री दीपक वैष्णव, नॅशनल प्रेसिडेंट सेंट्रल प्रेस जर्नलिस्ट असोसिएशनचे श्री संदीप कसाळकर, श्री पंढरीनाथ पगार उपस्थित होते हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार श्री राधाकृष्णजी विखे पाटील, माजी मंत्री श्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार सुजय दादा विखे पाटील, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री शेखर मुंदडा, कृषीभूषण श्री राजेंद्रजी कुंकूलोळ, जिल्हा बँक राहता तालुका विकास अधिकारी श्री सचिन तांबे यांनी अभिनंदन केले.

# बुध्दगया येथील मागण्यासंदर्भात निवेदनाव्दारे राष्ट्रपतींकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मेहकर येथे तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांच्या नेतृत्वाखाली मा. मडके साहेब तहसीलदार मेहकर यांच्या मार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये बुद्धगया येथील महाबोधी




महावीर मुक्त करण्याची न्याय मागणी मान्य करण्यात यावी या अशी विनंती करण्यात आली. मागणीसाठी बौद्ध भिक्कू तेरा दिवसापासून उपोषणाला बसले आहेत कित्येक भिक्कूची तब्येत चिंताजनक आहे. तरी शासन प्रशासन काही कार्यवाही करत नाही. बुद्धगया येथील महाबोधी महाविवार १९४९ चा व्यवस्थापन ॲक्ट तात्काळ दुरुस्ती करून महाबोधी महावीराचे संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धाचे हाती देण्यात यावे. बुद्धगया महाबोधी महाविवार येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनातील सर्व मागण्या त्वरित मंजूर कराव्यात व देशातील सर्व बौद्ध बांधवांच्या भावनेचचा विचार व आदर करून १९४९ च्या व्यवस्थापन ॲक्ट दुरुस्ती करावी ही तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने मेहकर तहसीलदार साहेब यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती भारत सरकार यांना निवेदन सादर करून मागणी करण्यात आली आहे.

यावेळी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई, रवि मिस्किन, राधेशाम खरात, प्रकाश शेजुळ, अनिल खंडारे, रामेश्वर रहाटे, शामराव शेजुळ, जगदिश एखंडे, कुणाल माने, अख्तर कुरेशी, विशाल लोहार, महिला आघाडी कांचन मोरे, लक्ष्मी कस्तुरे, प्रतिभा गवई, उषा सगट, आम्रपाली गवई, निता पैठणे, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी सामुदायिक प्रयत्न व्हावेत : प्रशांत अरबाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : मराठी भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे, त्यामुळे ही भाषा समृद्ध करण्यासाठी सामुदायिक प्रयत्न करणे गरजेचे आहे, तसेच इंग्रजीचे गोडवे गाणाऱ्या नागरिकांनी ही भाषा ज्ञानभाषा कशी होईल यासाठी जाणीवपूर्वक मोहीम हाती घेतली पाहिजे असे प्रतिपादन अक्कलकोट चे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी व्यक्त केले.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात मराठी भाषा दिनानिमित्त कार्यक्रम

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वांग्मय मंडळांनी मराठी भाषा दिन निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी हे होते.

पुढे ते म्हणाले की, लहानपणापासूनच अस्खलित मराठी भाषेत ज्ञान देण्यासाठी शैक्षणिक संस्थेतून प्रयत्न झाले पाहिजेत. परंतु आपल्या मुलाला इंग्रजी भाषा आलीच पाहिजे, असा आग्रह धरणारे पालक तुलनेने अधिक आहेत. आता त्यांनी मराठी भाषेचा आग्रह धरला पाहिजे. तेव्हाच मराठी भाषा ज्ञानभाषा होईल.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठीचा गौरव केला आहे. मराठी भाषेची गोडी अवीट आहे. साहित्य देखील विपुल आहेत, त्याचे वाचन केले पाहिजे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीने मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे, कारण सर्व जाती धर्माला जोडून घेणारी ही अभिजात भाषा आहे.







कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठीचे थोर साहित्यिक वा कवी वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, बसवराज शावरी प्रा. नेहा गंदमल आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस. आर. लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा. प्राची गणेचारी यांनी मानले.

### भाजप कीसान मोर्चा ची कारवाईची मागणी

### ठाणेदार यांना दिले निवेदन

# आमदार श्वेता महाले यांना धमकी देणाऱ्यास अटक करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : आमदार श्वेता महाले यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्याला त्वरित अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजप कीसान मोर्चा च्या वतीने करण्यात आली.

या संदर्भात भाजपा किसान मोर्चा चे चिखली तालुका अध्यक्ष डीगांबर जाधव, सुधाकर गिते प्रदेश भाजप कीसान मोर्चा चे सह संयोजक व कार्यकर्त्यांनी अमडापुर पोलिस स्टेशन मध्ये ठाणेदार यांना निवेदन दिले. २० फेब्रुवारी रोजी एका पत्राद्वारे आमदार श्वेता महाले यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. काही दिवसांपासून अनेक नेत्यांना धमक्या येत असल्यामुळे या प्रकरणावर पोलिस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. आमदार श्वेता महाले यांना धमकीचे पत्र पाठवणाऱ्या व्यक्तीला तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, निवेदनाद्वारे देण्यात आले आहे.




निवेदन देताना मा.डीगांबरभाऊ जाधव, ता.अध्यक्ष भाजपा किसान मोर्चा चिखली, सुधाकरराव गिते प्रदेश भाजप कीसान मोर्चा सह संयोजक, उध्दव पवार, रामभाऊ जाधव, नंदकीशोर गुंजकर, संदीप बोर्डे, अशोक जाधव, महादेव ठाकरे, बबनराव राऊत, प्रशांत पाखरे, नारायन धुमाळ, गोपाल ढोरे, आत्माराम मोरे, विठ्ठल मावळे, सुरेश शिवरकर, शिवाजी कोकणे, पांडुरग दांदडे, ज्ञानेश्वर देशमुख, नारायन कुटे, प्रदीप माळोदे, योगेश जुमडे, अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाकवी नामदेव ढसाळ यांना ओळखत नसणाऱ्या सेन्सॉर बोर्डाच्या सदस्यांना निलंबित करा : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिवंगत पद्मश्री नामदेव ढसाळ हे जागतिक दर्जाचे महाकवी होते.क्रांतिकारी साहित्यिक होते.त्यांनी आपल्या काव्यातून लेखनातून क्रांती घडवली आहे.क्रांतीची प्रेरणा देणारे त्यांचे साहित्य अजरामर आहे. त्यांना ओळखत नाही म्हणणाऱ्या सेन्सॉर बोर्डाच्या त्या सदस्यांना त्वरित निलंबित केले पाहिजे आणि नामदेव ढसाळ यांच्यावरील हल्ला बोल या सिनेमाला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र तात्काळ दिले पाहिजे अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली. सेन्सॉर बोर्डाच्या ज्या सदस्यांनी नामदेव ढसाळ यांना आओळखत नसल्याचे सांगत दलित चळवळीवरील



सिनेमा ला प्रमाणपत्र देण्यास विरोध केला त्यांचा आपण निषेध करीत असून त्यांना तात्काळ निलंबित केले पाहिजे असे आपले मत असल्याचे सांगत झालेल्या प्रकरणाचा ना.रामदास आठवले यांनी तीव्र निषेध केला आहे.

दलितांवरील अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी दलित साहित्या सोबत दलित पँथर या संघटनेची स्थापना करून नामदेव ढसाळ यांनी क्रांती घडवली आहे. त्यांना ओळखत नाही म्हणणारे सेन्सॉर बोर्डाचे दलोतद्रोही सदस्य निलंबित झाले पाहिजे.अशा मनोवृत्तीच्या लोकांना सेन्सॉर बोर्डात ठेवता कामा नये.नामदेव ढसाळ यांच्यावरील सिनेमाला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळालेच पाहिजे.चळवळीवरील हा सिनेमा प्रदर्शित होऊन जनमनसात पोहोचला पाहिजे.असे ना. रामदास आठवले म्हणाले.